क्रमांक : ४२६९ /ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : - 6 FEB 2017

:: परिपत्रक ::

**(अ) विधानपरिषद तारांकित/अतारांकित/अल्पसूचना प्रश्नांची उत्तरे QIS या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने या सचिवालयास पाठविण्याबाबत...**

मंत्रालयीन सर्व विभागांना निदेशानुसार कळविण्यात येते की, विधानपरिषदेच्या प्रश्नांचे कामकाज संपूर्णत: कागदरहीत करण्याचा पुढील टप्पा म्हणून विधानमंडळाचे कामकाज ऑनलाईन करण्याच्या दृष्टीने आगामी प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०१७ करिता तारांकित स्वीकृत प्रश्न विभागास ऑनलाईन पध्दतीने पाठविण्यात येणार असून, प्रश्नांची उत्तरे विहित कालावधीमध्ये **ऑनलाईन पध्दतीने** स्वीकारण्यात येणार आहेत.

याकरिता सर्व मंत्रालयीन विभागांच्या विधीमंडळ समन्वय कक्षातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना शुक्रवार, दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे **QIS** या वेब ॲप संगणकीय प्रणाली हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले असून तद्‌नंतर सदरहू प्रणाली वापरण्याकरिता सर्व मंत्रालयीन विभागांच्या विधीमंडळ समन्वय कक्षांस त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यासनांचे **Username** व **Password** पाठविण्यात आलेले आहेत. उक्त संगणकीय प्रणाली हाताळण्याबाबची **माहिती पुस्तिका** महाराष्ट्र विधानमंडळाच्या **mls.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

त्यानुसार आगामी अधिवेशनात विधानपरिषदेचे सर्व **तारांकित/अतारांकित व अल्पसूचना प्रश्न QIS** या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे सर्व मंत्रालयीन विभागांच्या विधीमंडळ समन्वय कक्षांना पाठविण्यात येतील. तद्‌नंतर सर्व समन्वय कक्षांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या संबंधित कार्यासनांना सदरहू प्रश्न सूचना **QIS** या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारेच पाठवाव्यात.

विधानपरिषदेच्या आगामी (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील मंत्रालयीन विभागांना उत्तराकरिता पाठविण्यात येणाऱ्या सर्व **तारांकित/अतारांकित/अल्पसूचना** प्रश्नांची उत्तरे **QIS** या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीनेच या सचिवालयास पाठविण्यात यावी तसेच **QIS** या वेब ॲप संगणकीय प्रणालीचा नव्याने होत असलेला वापर पाहता अपवादात्मक बाब म्हणून केवळ आगामी अधिवेशनाकरीताच उत्तराच्या १० प्रतींऐवजी **(Hard copies) ३** प्रतीच स्वीकारण्यात येतील.

विधानपरिषदेतील तारांकित स्वीकृत प्रश्नाचे विभागाकडून उत्तर प्राप्त होण्याचा दिनांक सुनिश्चित करून विभागास कळविण्यात येत असून त्यानुसार विभागाकडून कार्यवाही होत असते. तथापी प्रश्न हस्तांतरीत करण्याची परिस्थिती उद्‌भवल्यास उक्त बाब संबंधित विभागातील कक्षाने तातडीने कार्यवाही करून ज्या विभागाशी प्रश्न संबंधित आहे त्या विभागाकडे त्वरीत पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी. अशा प्रकरणामध्ये तातडीने **विधानपरिषद** प्रश्न कक्षाच्या **e1.qust.mls@gmail.com** या ई-मेलवर तसेच **QIS** प्रणालीद्वारे ऑनलाईन हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण करुन या सचिवालयास अवगत करण्यात यावे.

..२/-

ऑनलाईन उत्तर पाठविण्याकरिता संगणकामध्ये आवश्यक असलेली प्रणाली संयोजना **(System Configuration)** खालीलप्रमाणे :-

- संगणकाची **Operating System** ही **Windows 7 and above** असणे आवश्यक आहे.
- इंटरनेट वापराकरिता संगणकामध्ये मोझिला फायरफॉक्स **(Version 35 and above) Install** करणे आवश्यक आहे.
- **QIS** या वेब ॲप संगणकीय प्रणालीमध्ये उत्तराच्या रकान्यांत प्रश्नाचे उत्तर हे युनिकोड फाँटमध्येच टंकलिखित केलेले असावे.
- विधानमंडळाला उत्तर पाठविताना उत्तर कॉपी करावयाचे असल्यास ते **Word file** मधून **Text file (Notepad)** मध्ये **Paste** करावे व **Text file** मधूनच **Copy** करुन उत्तराच्या रकान्यामध्ये Paste करावे.

**(ब) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१७ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरीता नेमून देण्यात आलेल्या दिनांकाबाबतचे विवरणपत्र**

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०१७ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील **सोमवार, दिनांक ६ मार्च, २०१७** ते **गुरूवार, दिनांक १३ एप्रिल, २०१७** या कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तरांबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र (पुढील पृष्ठावर छापल्याप्रमाणे) आपल्या माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

(१) मा.मंत्री यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी नेमून देण्यात आलेले दिनांक.
(२) तारांकित प्रश्नांच्या उत्तरांच्या प्रत्येकी ०३ (तीन) प्रती छापील स्वरुपात (हार्ड कॉपी) व डिजिटल स्वरुपातील (सॉफ्ट कॉपी) या सचिवालयास मिळण्याचा अंतिम दिनांक.

(पूनम ढगे)
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

<u>प्रति :</u>

(१) संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
(२) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई (प्रत्येकी तीन प्रती)
(३) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
(४) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (प्रत्येकी तीन प्रती)
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.

# महाराष्ट्र विधानपरिषद

## प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०१७

### तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक तसेच विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक इत्यादीबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| गट क्रमांक (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | विभागाकडून उत्तर प्राप्त होण्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास व वक्फ मंत्री<br>(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री<br>(३) पर्यावरण मंत्री<br>(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | सोमवार, दिनांक २० मार्च, २०१७<br>सोमवार, दिनांक २७ मार्च, २०१७<br>सोमवार, दिनांक ३ एप्रिल, २०१७<br>*सोमवार, दिनांक १० एप्रिल, २०१७ | शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०१७<br>शनिवार, दिनांक १८ मार्च, २०१७<br>सोमवार, दिनांक २७ मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७ |
| दोन | (१) आदिवासी विकास मंत्री<br>(२) उद्योग व खनिकर्म मंत्री<br>(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(४) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री<br>(५) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री | मंगळवार, दिनांक ७ मार्च, २०१७<br>मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०१७<br>मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०१७<br>*मंगळवार, दिनांक ११ एप्रिल, २०१७ | मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७<br>शनिवार, दिनांक ४ मार्च, २०१७<br>मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०१७<br>सोमवार, दिनांक ३ एप्रिल, २०१७ |
| तीन | (१) मुख्यमंत्री<br>(२) गृहनिर्माण मंत्री<br>(३) कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री | बुधवार, दिनांक ८ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक १५ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक २२ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक ५ एप्रिल, २०१७<br>*बुधवार, दिनांक १२ एप्रिल, २०१७ | बुधवार, दिनांक १ मार्च, २०१७<br>सोमवार, दिनांक ६ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक १५ मार्च, २०१७<br>सोमवार, दिनांक २० मार्च, २०१७<br>सोमवार, दिनांक २७ मार्च, २०१७<br>सोमवार, दिनांक ३ एप्रिल, २०१७ |
| चार | (१) वित्त व नियोजन, वने मंत्री<br>(२) ग्रामविकास, महिला व बाल विकास मंत्री<br>(३) वैद्यकीय शिक्षण,जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(५) जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री<br>(६) रोजगार हमी योजना, पर्यटन मंत्री | गुरूवार, दिनांक ९ मार्च, २०१७<br>गुरूवार, दिनांक १६ मार्च, २०१७<br>गुरूवार, दिनांक २३ मार्च, २०१७<br>गुरूवार, दिनांक ३० मार्च, २०१७<br>गुरूवार, दिनांक ६ एप्रिल, २०१७<br>*गुरूवार, दिनांक १३ एप्रिल, २०१७ | गुरूवार, दिनांक २ मार्च, २०१७<br>मंगळवार, दिनांक ७ मार्च, २०१७<br>गुरूवार, दिनांक १६ मार्च, २०१७<br>मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक ५ एप्रिल, २०१७ |
| पाच | (१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री<br>(३) कृषी, फलोत्पादन मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री | शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल, २०१७ | शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक ८ मार्च, २०१७<br>शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०१७<br>बुधवार, दिनांक २२ मार्च, २०१७<br>गुरूवार, दिनांक ३० मार्च, २०१७ |

* आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक ६ मार्च, २०१७ ते शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल, २०१७ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून जादा एक आठवडयाच्या प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.